# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. १२/२००५.** **दिनांक १४.०८.२००५**
**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी १.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे रविवार दिनांक १४ ऑगस्ट, २००५ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील एसएसएस -वशी-०४-८३६६-२००५ ,दिनांक ०८ ऑगष्ट, २००५ रोजीचे पत्राने सर्व सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा रविवार दिनांक १४ ऑगस्ट, २००५ रोजी दुपारी १.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग |
| ०३. | मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे | ०४. | मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे |
| ०५. | मा. डॉ. एकनाथ भागचंद गोंदकर | ०६. | मा.श्री.रमाकान्त गणेश कर्णिक |
| ०७. | मा.श्री. अशोक भिमाशंकर खांबेकर | ०८. | मा.श्री.कैलास गोविंदराव कोते |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे
कार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबतच्या मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष, मा.श्री राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील, मा.श्री.प्रकाश रामदास काळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा, मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्डये,मा.डॉ.प्यारेलाल तिवारी यांचे दूरध्वनी निरोपाची तसेच मा.श्री.समि खतिब यांचे पत्राची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१.** **संस्थानला अकुशल/कुशल व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या ठेकेदार/कंत्राटदार यांचेशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.४७०.** संस्थानला कुशल-अकुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी ठेकेदारी पध्दतीने पुरविणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन एकूण ४२ ठेकेदारांनी आपल्या निविदा सादर केल्या होत्या. आलेल्या या निविदा व्यवस्थापन समितीचे दि.९/७/२००५चे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना आजचे सभेपूढे चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविणेत आले होते.

सभेचे सुरुवातीस उपस्थित सर्व कंत्राटदारांना मा.अध्यक्षांनी किमान वेतनाचे दर, भविष्य निर्वाह निधी, सर्व्हिस टॅक्स, कामगार नुकसान भरपाई, बोनस, ग्रुप इन्श्यूरन्स व घरभाडे भत्ता उपदान, रजा/सुट्या याबाबत उत्तरदायीत्वांची जाणीव करुन दिली. कंत्राटी कामगारांना किमान वेतन दराने देय वेतन, (तसेच मुंबई कार्यालयातील सुरक्षा गार्ड व कंत्राटी अकुशल कामगारांना बॉम्बे शॉप अॅण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.१ प्रमाणे देय असलेले किमान वेतन) प्रा.फंडापोटी मालकाचा हिस्सा व त्यावरील प्रशासकीय चार्जेससह अंशदान, ग्रुप इन्शूरन्स प्रिमीयम व सर्व्हिस टॅक्स (फक्त सिक्यूरिटी कंत्राटी कामगारांकरिता सर्व्हीस टॅक्स लागू राहील) या कारणासाठीची रक्कम कंत्राटदाराला संस्थानकडून देण्यात येईल. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे हिस्याची प्रॉ.फंड वर्गणीची रक्कम @ १२ % संबंधित कॉन्ट्रॅक्टर्सचे बिलातून कपात करुन तसेच कंत्राटदारास संस्थानकडून दिली जाणारी प्रा.फंड (मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह (१३.६१ %) अशा दोन्हीही कारणांसाठी पी.एफ रक्कमेचा, स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचा डी.डी./चेक संबधीत कंत्राटदारास भरणेकामी देण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर सर्व कायदेशिर उत्तरदायित्वाची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. अशा रितीने कंत्राटदार म्हणून आपल्यावरील संभाव्य संपूर्ण आर्थिक बोजा लक्षात घेऊनच विविध प्रकाराचे कंत्राटी कामगार/कर्मचारी/अधिकारी यांच्या संबंधीचे आपले अंतिम दर व सर्व्हिस चार्ज इ. वाटाघाटीच्या वेळी त्यांनी द्यावेत असें उपस्थित सर्व कंत्राटदारांना समजावून दिले. त्यानंतर चर्चा/वाटाघाटीमध्ये कंत्राटदारांनी खालीलप्रमाणे सुधारित अंतीम दर दिले.

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नाव | संरक्षण अधिकारी (प्र.दिन दर रुपये) | सुपरवायझर (प्र.दिन दर रुपये) | सशस्त्र सुरक्षा रक्षक (प्र.दिन दर रुपये) | सर्व्हिस चार्ज % | सर्व्हिस टॅक्स % |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | टॉप्स सिक्युरिटी लिमिटेड.अंबड, नासिक-१०<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>२१४.००<br>१७९.८७ | <br><br>१५४.००<br>१२६.११ | <br><br>२५५.००<br>२१५.७२ | <br><br>५%<br>५% | <br><br>१०.२०%<br>१०.२०% |
| ०२. | सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. विलेपार्ले (प)मुंबई-४०००५६<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१३०.००<br>१३०.०० | <br><br>८४.९५<br>८४.९५ | <br><br>१२५.००<br>१२५.०० | <br><br>०.०५ %<br>०.०५ % | <br><br>१०.२ %<br>१०.२ % |
| ०३. | एससीआय इंटरनॅशनल सिक्युरिटीज लिमिटेड अंधेरी (ईस्ट ) मुंबई-४०००५९<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>२३०.००<br>२००.०० | <br><br>१५३.००<br>१३५.०० | <br><br>१५१.००<br>१४०.०० | <br><br>१० %<br>७ % | <br>(As per<br>Govt.<br>Rules) |
| ०४. | ग्रुप फोर सिक्युरिटीज गार्डींग प्रा.लि. पौड रोड, पुणे-३८<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>२३६.००<br>अनुपस्थित | <br><br>१५९.००<br>अनुपस्थित | <br><br>२३६.००<br>अनुपस्थित | <br><br>१.६१ %<br>अनुपस्थित | <br><br>---<br>अनुपस्थित |
| ०५. | सन सिक्युरिटी सर्व्हीसेस परमार नगर, पुणे-४११०१३<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१५३.७५<br>१५३.७५ | <br><br>१३९.७५<br>१३९.७५ | <br><br>१४९.४२<br>१४९.४२ | <br><br>०२ %<br>०२ % | <br><br>१०.२%<br>१०.२०% |
| ०६. | मे.सिध्दार्थ सर्व्हीसेस, सिडको, औरंगाबाद- ४३१००३<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>३००.००<br>२४०.०० | <br><br>२००.००<br>१८०.०० | <br><br>१८३.००<br>१५३.०० | <br><br>१० %<br>०४ % | <br><br>१०.२०%<br>(As per Govt. Rules) |
| ०७. | मेडीएटर्स ॲन्ड अजंठा सिक्युरिटी प्रा.लि., सिडको, औरंगाबाद-४३१००३<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>२१३.००<br>२००.०० | <br><br>१६१.६५<br>१५०.०० | <br><br>२०६.९८<br>२००.०० | <br><br>०.५ %<br>०.५ % | <br><br>१०.२%<br>१०.२% |
| ०८. | कृष्णा सिक्युरिटी सर्व्हीसेस, घाटकोपर(पुर्व) मुंबई-४०००७५<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१५८.२८<br>१५८.२८ | <br><br>११६.००<br>११६.०० | <br><br>१४०.००<br>१४०.०० | <br><br>३ %<br>३ % | <br><br>१०.२%<br>१०.२% |
| ०९. | फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हीसेस.कांदिवली (ई),मुंबई-४००१०१<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>११९.७९<br>१३४.६० | <br><br>११२.७९<br>१०७.७० | <br><br>११९.७९<br>११९.७९ | <br><br>१ %<br>१ % | <br><br>-----<br>१०.२ % |
| १०. | ट्रीग डिटेक्टीव्हज (प्रा.)लि.,जुहू ,मुंबई-४०००४९<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>२५५.९२<br>२३०.०९ | <br><br>२२४.४६<br>२०१.३२ | <br><br>२९८.६१<br>२४०.५८ | <br>दरामध्ये<br>समावेश<br>५ % | <br>दरामध्ये<br>समावेश<br>१०.२ % |
| ११. | बी-कॅट सिक्यूरिटी सर्व्हीसेस, ठाणे (वेस्ट), ४००६०१<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>२३०.७६<br>अनुपस्थित | <br><br>१७३.०७<br>अनुपस्थित | <br><br>१०३.०७<br>अनुपस्थित | <br><br>०० %<br>अनुपस्थित | <br><br>---<br>अनुपस्थित |
| १२. | महाराष्ट्र सुरक्षा रक्षक औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित. गोखलेनगर, पुणे.<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१५०.००<br>१३०.०० | <br><br>१३३.००<br>१२०.०० | <br><br>२००.००<br>२००.०० | <br><br>७ %<br>७ % | <br><br>---<br>१०.२ % |
| १३. | सावली मॅनेजमेंट कन्सलटंन्सी प्रा.लि. . शिवाजीनगर, पुणे-४११००५<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१५०.००<br>१५०.०० | <br><br>१४०.००<br>१४०.०० | <br><br>१४०.००<br>१४०.०० | <br><br>५ %<br>४ % | <br>(As per<br>Govt.<br>Rules) |
| १४. | श्री साई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढी लि. शिरडी<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१३०.००<br>१३०.०० | <br><br>८४.९५<br>८४.९५ | <br><br>११५.००<br>११५.०० | <br><br>०.१० %<br>०० % | <br><br>---<br>--- |
| १५. | बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इंडिया) लि. नासिक-पुणे रोड, नासिक-४२२१०१<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१४८.७७<br>१४७.८९ | <br><br>१३३.३८<br>१३२.५० | <br><br>१४८.७७<br>१४७.८९ | <br><br>१.०० %<br>०.४० % | <br><br>---<br>१०.२०% |
| १६. | संतोष केरवेल सर्व्हीसेस प्रा.लि. नासिकरोड<br>**निविदेतील दर** | <br><br>१५०.१० | <br><br>१३४.७१ | <br><br>१५०.०० | <br><br>२.५ % | <br><br>--- |

| अ.नं | निविदासादरकर्त्याचे नाव | संरक्षण अधिकारी (प्र.दिन दर रुपये) | सुपरवायझर (प्र.दिन दर रुपये) | सशस्त्र सुरक्षा रक्षक (प्र.दिन दर रुपये) | सर्व्हिस चार्ज % | सर्व्हिस टॅक्स % |
|---|---|---|---|---|---|---|
| | **वाटाघाटीनंतरचे दर** | १२५.०० | ११०.०० | १२५.०० | १.५ % | १०.२% |
| १७. | स्पेअरहेड सिक्युरिटी जामखेडरोड, अहमदनगर<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१६९.००<br>१४०.०० | <br><br>१४२.००<br>१०१.०० | <br><br>१६९.००<br>११९.०० | <br><br>५ %<br>०.५० % | <br><br>---<br>१०.०२ % |
| १८. | सेफ गार्ड सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस. औरंगाबादरोड, अहमदनगर.<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१३०.००<br>१३०.०० | <br><br>८४.९५<br>८४.९५ | <br><br>११५.००<br>११५.०० | <br><br>०.०८ %<br>२०० कर्मचाऱ्यांपर्यंत ८% व त्यापुढे ७.५० % | <br><br>---<br>--- |
| १९. | मे.प्रॉपर्टी गार्डस सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. स्टर्लिंग सेंटर थर्ड फ्लोअर, महात्मा गांधी रोड पुणे -४११००१<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br><br>१३०.००<br>१२८.०० | <br><br><br>९१.३७<br>९१.३७ | <br><br><br>११५.००<br>११५.०० | <br><br><br>०.०५ %<br>५ % | <br><br><br>---<br>१०.२ % |
| २०. | मेसर्स सुवर्णा एंटरप्राईझेस हडपसर, पुणे-२८<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१६२.३२<br>१६७.५५ | <br><br>१०९.९३<br>११३.४७ | <br><br>१५२.७८<br>१५७.७० | <br><br>०.०१ %<br>४ %<br>(दरात समावेश) | <br><br>---<br>१०.२ %<br>(दरात समावेश) |
| २१. | बॅटल गार्डस् सर्व्हीसेस झणकारनगर, नागपूर-४४००१०<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१२४.८०<br>अनुपस्थित | <br><br>८८.७८<br>अनुपस्थित | <br><br>१२४.८०<br>अनुपस्थित | <br><br>६.०० %<br>अनुपस्थित | <br><br>१०.२%<br>अनुपस्थित |
| २२. | प्रशांत औद्योगिक कामगार ॲन्ड सुरक्षा रक्षक सह.संस्था लि. निगडी, पुणे-<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१६०.००<br>१६०.०० | <br><br>११०.००<br>११०.०० | <br><br>१४०.००<br>१४०.०० | <br><br>४ %<br>३ % | <br><br>---<br>१०.२% |
| २३. | जय भवानी इंटरप्रायझेस, चिंचवड, पुणे<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br>१७०.००<br>१७०.०० | <br>१२०.००<br>१२०.०० | <br>१५०.००<br>१५०.०० | <br>५ %<br>४ % | <br>१०.२%<br>१०.२% |
| २४. | अविसागर लेबर सप्लायर्स, सातपूर, नासिक.<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१४५.००<br>१३०.०० | <br><br>१४०.००<br>१०५.०० | <br><br>१६०.००<br>१४०.०० | <br><br>३.५० %<br>२.५ % | <br><br>----<br>(सरकारी नियमानुसार ) |
| २५. | अल्ससिक्युअर ॲन्ड प्रोटेक्शन सर्व्हीसेस (इंडिया) प्रा.लि., जोगेश्वरी (ई ) मुंबई<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१२४.००<br>अनुपस्थित | <br><br>१०८.००<br>अनुपस्थित | <br><br>१५०.००<br>अनुपस्थित | <br><br>३ %<br>अनुपस्थित | <br><br>---<br>अनुपस्थित |
| २६. | श्रीकृपा सर्व्हीसेस प्रा.लि., आकुर्डी, पुणे-३५<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>३५०.००<br>२४०.०० | <br><br>३००.००<br>२००.०० | <br><br>२७५.००<br>१८६.०० | <br><br>०.७५ %<br>०.७५ % | <br><br>---<br>१०.२०% |
| २७. | एक्स सर्व्हीमेन मल्टीपल सर्व्हीसेस ॲन्ड कन्सलटंट, एरवडा, पुणे-४११००७<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१३०.००<br>१४७.६९ | <br><br>८४.९५<br>९६.५१ | <br><br>११५.००<br>१३०.६५ | <br><br>५ %<br>२०हजार प्रती माह | <br><br>१०.२%<br>१०.२% |
| २८. | ग्रुप सेव्हन गार्डस् (इं)प्रा.लि., वरळी, मुंबई-४०००१३<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>१४७.००<br>अनुपस्थित | <br><br>१२७.००<br>अनुपस्थित | <br><br>२५५.००<br>अनुपस्थित | <br><br>१० %<br>अनुपस्थित | <br><br>१०.२%<br>अनुपस्थित |
| २९. | डायनॅमिक सिक्युरिटी ॲन्ड डिटेक्टीव्ह एजन्सी प्रा.लि.,अंधेरी (ईस्ट),मुंबई-४०००६०<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br><br>१७५.००<br>१७५.०० | <br><br><br>११८.००<br>११८.०० | <br><br><br>१७०.००<br>१७०.०० | <br><br><br>६.३ %<br>५ % | <br><br><br>१०.२%<br>१०.२% |
| ३०. | नॅशनल सिक्युरिटी सर्व्हीसेस, पुणे-४११०१६<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | <br><br>२२५.००<br>२००.०० | <br><br>१२६.५६<br>१२६.५० | <br><br>२५०.००<br>२००.०० | <br><br>५ %<br>३ % | <br><br>१०.२ %<br>०.००% |
| ३१. | ईगल सिक्युरिटी ॲन्ड पर्सोनेल सर्व्हीस, अंधेरी (वेस्ट),मुंबई-४०००५८ | | | | | |

| अ.नं | निविदासादरकर्त्यांचे नाव | संरक्षण अधिकारी (प्र.दिन दर रुपये) | सुपरवायझर (प्र.दिन दर रुपये) | सशस्त्र सुरक्षा रक्षक (प्र.दिन दर रुपये) | सर्व्हिस चार्ज % | सर्व्हिस टॅक्स % |
|---|---|---|---|---|---|---|
| | **निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | २११.५३<br>१७०.०० | १०८.०९<br>८७.०० | १८९.०३<br>१७०.०० | ०.५ %<br>५ % | १०.२%<br>०.००% |
| ३२. | शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुज.)प्रा.लि.,कुर्ला (वेस्ट),मुंबई-४०००७०<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | ११२.६९<br>११२.६९ | १०८.८४<br>१०८.०० | १९२.००<br>१८५.०० | १ %<br>१ % | ---<br>१०.२% |
| ३३. | बीव्हीजी इंडिया लिमिटेड,शिवाजीनगर, पुणे-५<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | १८३.०५<br>१८३.५ | १८०.००<br>१८०.०० | ---<br>--- | २ %<br>१.७५ % | ---<br>१०.२ % |
| ३४. | कुशांग सिक्युरिटी ॲन्ड प्रोटेक्शन सर्व्हीसेस,वडाळा (ईस्ट),मुंबई-४०००३७<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | १७५.००<br>अनुपस्थित | १४५.००<br>अनुपस्थित | २४०.००<br>अनुपस्थित. | २.८५ %<br>अनुपस्थित. | ---<br>--- |
| ३५. | क्रिस्टाल ट्रेडकॉम प्रा.लि.,सायन, मुंबई-४०००२२<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | १५५.००<br>१५३.०० | ८५.००<br>८५.०० | १२५.००<br>१२५.०० | ०.७५ %<br>०.७५ % | १०.२%<br>१०.२% |
| ३६. | सेंट्रल इन्व्हीस्टीगेशन सिक्युरिटी सर्व्हीसेस लि.,अंधेरी (वेस्ट),मुंबई-४०००५३<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | २३०.८४<br>अनुपस्थित | २३०.८४<br>अनुपस्थित | २५०.००<br>अनुपस्थित | ५ %<br>अनुपस्थित | ---<br>अनुपस्थित |
| ३७. | कॅटस् फायर ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस, ठाणे (वेस्ट), मुंबई-४००६०१<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | १८२.६९<br>अनुपस्थित | १३४.६१<br>अनुपस्थित | १२६.९२<br>अनुपस्थित | १० %<br>अनुपस्थित | ---<br>अनुपस्थित |
| ३८. | श्री.महेंद्र एम.गंधे.अहमदनगर.<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | ---<br>--- | ----<br>--- | ---<br>--- | ०.२० %<br>०.२० % | लागु झाल्यास द्यावा लागेल. |
| ३९. | जय हनुमान लेबर सर्व्हीसेस औरंगाबाद.<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | ---<br>--- | ----<br>--- | ---<br>---- | १० %<br>८ % | ५%<br>शासन नियमाप्रमाणे |
| ४०. | मे.जय संतोषीमाता मॅनपॉवर मॅनेजमेंट सर्व्हीसेस प्रा.लि. मुलुंड (प) मुंबई-४०००२<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | ---<br>--- | ----<br>--- | ---<br>---- | ६ %<br>५ % | ---<br>१०.२ % |
| ४१. | एक्सट्रा लेबर फोर्स,<br>ठाणे (वेस्ट),४०००६०१<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | ---<br>--- | ----<br>--- | ---<br>---- | ---<br>अनुपस्थित | ---<br>अनुपस्थित |
| ४२. | संपूर्ण सुरक्षा आणि अलाईड सर्व्हीसेस, वाशी, नवी मुंबई-४००७०३<br>**निविदेतील दर**<br>**वाटाघाटीनंतरचे दर** | ---<br>--- | ----<br>--- | ---<br>---- | ---<br>अनुपस्थित | ---<br>अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला कंत्राटी पद्धतीने कुशल-अकुशल व सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी खालील एजन्सीजची कंत्राटी कामगार पुरविण्याची क्षमता विचारात घेऊन सदर एजन्सीचे दर मान्य करण्यात येऊन त्यांना कर्मचारी पुरविणेबाबत आदेश देण्यात यावा असे ठरले.

**(अ) कुशल व अकुशल कंत्राटी कामगार**- कुशल व अकुशल कंत्राटी कामगार पुरविणेकामी खालीलप्रमाणे दोन निविदासादरकर्त्यांचे न्युनतम दर मान्य करण्यात आले-

०१. बीव्हीजी इंडिया लिमिटेड,शिवाजीनगर, पुणे-५

०२. क्रिस्टाल ट्रेडकॉम प्रा.लि.,सायन, मुंबई-४०००२२

या निविदासादरकर्त्यांना शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं.०३ (तसेच मुंबई कार्यालयासाठी झोन नं.१) प्रमाणे किमान वेतन दर वेळोवेळी शासनाकडून होणाऱ्या वाढीनुसार अधिक एकूण वेतनावर ०.७५% इतका सर्व्हिस चार्ज देण्यात यावा. याशिवाय प्रॉ.फंड (मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह १३.६१ % अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शूरन्स प्रिमियम (अंशदान) याप्रमाणे रक्कम देण्यात यावी.

**(ब) <u>सुरक्षा कंत्राटी कामगार</u> -** सुरक्षा कंत्राटी कामगार पुरविणेकामी खालीलप्रमाणे दोन निविदासादरकर्त्यांचे न्युनतम दर मान्य करण्यात आले-

०१. सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. विलेपार्ले (प)मुंबई-४०००५६

०२. शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुज.)प्रा.लि.,कुर्ला (वेस्ट),मुंबई-४०००७०

या निविदासादरकर्त्यांना -

(अ) संरक्षण अधिकारी- रुपये १३० प्रती दिन

(ब) सुरक्षा पर्यवेक्षक- रुपये ८५.३९ प्रती दिन

(क) सशस्त्र सुरक्षा रक्षक रुपये १२५ प्रती दिन

(ड) सुरक्षा रक्षक-शॉप ॲण्ड कमर्शिअल इस्टॅब्लीशमेंट झोन नं. ०३ (तसेच मुंबई कार्यालयासाठी झोन नं.०१ ) प्रमाणे अकुशल साठी शासनाकडून वेळोवेळी जाहीर होणारे किमान वेतन दर निश्चित करण्यात आले. या दोन्हीही ठेकेदारांना एकूण वेतनावर ०.०५% इतका सर्व्हिस चार्ज, अधिक १०.२० % सर्व्हिस टॅक्स (लागू असेल त्याप्रमाणे) अधिक कामगार नुकसान भरपाई अधिनियम अंतर्गत ग्रुप इन्शूरन्स प्रिमियम (अंशदान) अधिक प्रॉ.फंड (मालकाचा हिस्सा) प्रशासकीय चार्जेससह १३.६१ % या प्रमाणे रक्कम देण्यात यावी.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.०२. सन २००४-०५ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल (Statutory Audit Report) व लेखापरिक्षीत लेख्यांची (Audited Accounts) नोंद घेणे बाबत.**

**निर्णय क्र.४७१.** सन २००४-०५ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवाल (Statutory Audit Report) व लेखापरिक्षीत लेख्यांच्या (Audited Accounts) प्रती सर्व विश्वस्तांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन ते सोबत **<u>परिशिष्ट " अ" म्हणून</u>** ठेवण्यात आले आहे.

सदर अहवालाची नोंद घेण्यात आली असून अधिनियम २००४ कलम नं. २९ (सुधारित ) मधील तरतूदीअन्वये प्रशासनिक अहवालासह विहीत अहवाल वजा प्रस्ताव शासनाकडे सत्वर सादर करण्यात यावा आणि सदर लेखापरिक्षण अहवालामधील मुद्यांवरील सविस्तर पुर्तता अहवाल शक्य तितक्या लवकर मा.व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा, असे निर्देश प्रशासनास देण्यात आले.

(कार्यवाही-सर्व प्रशासकीय अधिकारी / मुख्य लेखाधिकारी /अधिक्षक/विभागप्रमुख)

**विषय नं.०३. सन २००४-०५ चे वार्षिक प्रशासनीक अहवाल (Annual Administrative Report) ची नोंद घेऊन राज्य शासनाकडे सादर करणे बाबत.**

**निर्णय क्र.४७२.** सन २००४-०५ चे वार्षिक प्रशासनीक अहवालाच्या (Annual Administrative Report) प्रती सर्व विश्वस्तांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन ते सोबत **<u>परिशिष्ट "ब" म्हणून</u>** ठेवण्यात आले आहे. सदरचा अहवाल अधिनियम कलम २९ मधील तरतूदीअन्वये विहीत अहवाल वजा प्रस्तावासह राज्य शासनास पाठविण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, आस्थापना विभाग)

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१. सर्वश्री रघुनाथ भागा आहेर, उपमुख्य अभियंता, संजय मधुकर जोरी, कनिष्ठ अभियंता, व दिनकर मनोहर देसाई, कनिष्ठ अभियंता, यांना वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करणेबाबत.**

**निर्णय क्र.४७३.** सर्वश्री रघुनाथ भागा आहेर, उपमुख्य अभियंता, संजय मधुकर जोरी, कनिष्ठ अभियंता व दिनकर मनोहर देसाई, कनिष्ठ अभियंता यांनी त्यांचे दिनांक ०५.०८.२००५ चे अर्जान्वये महाराष्ट्र शासन पाटबधारे विभाग शासन निर्णय क्र.नियुक्ती १२९९/(१४/९९) आ.(शा.अ.) मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक ०९ फेब्रुवारी, २००० नुसार कनिष्ठ अभियंता पदावर सलग सेवेची पाच वर्षे पुर्ण झाल्यामूळे दिनांक ०१.०४.१९९८ पासून तिघांनाही रुपये ६५००-१०५०० ही वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात यावी. तसेच श्री रघुनाथ भागा आहेर यांना उपमुख्य अभियंता या पदाची रुपये ८०००-१३५०० ही वेतनश्रेणी दिनांक १३.१२.२००३ पासून मंजूर करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे.

उपरोक्त अर्जदार यांचे संस्थानमधील सेवेचा तपशील व त्यांचे वेतनश्रेणीसंदर्भात वस्तुस्थिती खालीलप्रमाणे-

०१) **<u>श्री रघुनाथ भागा आहेर</u>**

शैक्षणिक पात्रता - डी.सी.ई

"मिस्त्री" या पदावर रुपये २६०-४९५ या वेतनश्रेणीत प्रारंभीची नेमणूक दिनांक ०७.०२.१९८५

"मिस्त्री" हे पदनाम "स्थापत्य निरीक्षक" असे केले दिनांक २८.०८.१९८६ "स्थापत्य निरीक्षक " हे पदनाम कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (वेतनश्रेणी रुपये १४००-२३००) असे करण्यात आले दिनांक १४.१०.१९९१
रुपये १६४०-२९०० वेतनश्रेणी दिनांक ०१.०८.१९९५ पासून मंजूर करुन त्यावेळचे वेतन रुपये १८८० निश्चित करण्यात आले
उपमुख्य अभियंता या पदावर (रुपये ६५००-१०५००) पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १८.०७.२००० पासून पदोन्नती देण्यात आली.
सध्याचे मूळ वेतन रुपये ७७००/-

०२) **श्री संजय मधूकर जोरी**
शैक्षणिक पात्रता - डी.सी.ई
" स्थापत्य निरीक्षक" (वेतनश्रेणी रुपये २६०-४९५) या पदावर नियुक्ती दिनांक ११.०२.१९८७
"स्थापत्य निरीक्षक " हे पदनाम कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (वेतनश्रेणी रुपये १४००-२३००) असे करण्यात आले दिनांक १४.१०.१९९१
रुपये १६४०-२९०० वेतनश्रेणी दिनांक ०१.०८.१९९५ पासून मंजूर करुन त्यावेळचे वेतन रुपये १८८० निश्चित करण्यात आले
आश्वासीत प्रगती योजनेनुसार कनिष्ठ अभियंता पदावर १२ वर्षे सेवा पूर्ण झाल्याने रुपये ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी दिनांक ०१.०८.२००३ पासून देण्यात आली.
सध्याचे मूळ वेतन रुपये ७७००/-

०३) **श्री दिनकर मनोहर देसाई**
शैक्षणिक पात्रता - डी.सी.ई
" स्थापत्य निरीक्षक" (वेतनश्रेणी रुपये २६०-४९५) या पदावर नियुक्ती दिनांक १६.०२.१९८७
"स्थापत्य निरीक्षक " हे पदनाम कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (वेतनश्रेणी रुपये १४००-२३००) असे करण्यात आले दिनांक १४.१०.१९९१
रुपये १६४०-२९०० वेतनश्रेणी दिनांक ०१.०८.१९९५ पासून मंजूर करुन त्यावेळचे वेतन रुपये १८८० निश्चित करण्यात आले
आश्वासीत प्रगती योजनेनुसार कनिष्ठ अभियंता पदावर १२ वर्षे सेवा पूर्ण झाल्याने रुपये ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी दिनांक ०१.०८.२००३ पासून देण्यात आली.
सध्याचे मूळ वेतन रुपये ७७००/-

मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक १३.१२.२००३ चे सभेतील निर्णय क्र.५९३ नुसार श्री आहेर हे दिनांक १८.०७.२००० पासून वरिष्ठ मुख्य अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळीत असल्यामूळे त्यांना पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १८.०७.२००० पासून उपमुख्य अभियंता या पदावर रुपये ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी देऊन पदोन्नती देण्यात आली ते सध्या या पदावर कार्यरत आहेत.

त्याचबरोबर मा.व्यवस्थापन मंडळाचे दिनांक १/३जूलै,२००४ चे सभेतील निर्णय क्र.३५७ नुसार शासनाच्या २० जूलै २००१ व दिनांक ०३.०८.२००३ या आश्वासीत प्रगती योजनेअंतर्गत शासन जी आर मधील तरतूदीनुसार श्री देसाई व श्री जोरी या दोहोंची कनिष्ठ अभियंता या पदावर सलग बारा वर्षे सेवा पूर्ण झाल्याने दिनांक ०१.०८.२००३ पासून रुपये ६५००-१०५०० ही कालबध्द वरची वेतनश्रेणी देण्यात आलेली आहे.

आता, सदरहू तीन कनिष्ठ अभियंता यांनी महाराष्ट्र शासनाच्या पाटबंधारे विभागाचे दिनांक ०९.०२.२००० मधील तरतूदीनुसार त्यांना कनिष्ठ अभियंता या पदावर पाच वर्षे सेवा पूर्ण झाल्यानंतर दिनांक ०१.०८.१९९६ पासून शाखा अभियंता या पदाची रुपये ६५००-१०५०० मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

सर्वश्री आहेर, जोरी व देसाई या अभियंत्यांनी केलेली मागणी मान्य केल्यास त्यांचे मागणीसाठी आधारभूत असलेला पाटबंधारे विभागाचा दिनांक ०९.०२.२००० चा शासन निर्णय दिनांक ०१.०४.१९९८ पासून अंमलात येण्याची तरतूद असल्याने दिनांक ०१.०४.१९९८ पासून ते या जी.आर प्रमाणे फायदा देण्यास पात्र धरता येतील.

महाराष्ट्र राज्य नागरीसेवा (सुधारित वेतन ) नियम १९९८ सार्वजनिक बांधकाम विभागाक्डील उपअभियंता (डेप्युटी इंजिनिअर) या पदासाठी रुपये ८०००-१३५०० ही वेतनश्रेणी देय आहे. दिनांक १३.१२.२००३ पासून म्हणजे त्यांना उपमुख्य अभियंता हे पद

मंजूर केल्याच्या मा.व्यवस्थापन मंडळाच्या सभेच्या तारखेपासून सदरची वेतनश्रेणी मिळावी अशी श्री आहेर यांची मागणी आहे.

उपरोक्तप्रमाणे सर्वश्री आहेर, जोरी, देसाई यांना दिनांक ०९.०२.२००० चे पाटबंधारे विभागाचे शासन निर्णयातील तरतूदीनुसार दिनांक ०१.०४.१९९८ पासून जोरी व देसाई यांना शाखा अभियंता हे पदनाम व या पदाची रुपये ६५००-१०५०० ही वेतनश्रेणी मंजूर केल्यास तसेच श्री आहेर यांना दिनांक १३.१२.२००३ पासून उपमुख्य अभियंता या हे पद महाराष्ट्र शासनाच्या उपअभियंता या पदास समकक्ष करण्यात येत आहे. या पदाची रुपये ८०००-१३५०० ही वेतनश्रेणी मंजूर केल्यास आज मितीस दिनांक ०१.०८.२००५ रोजी संबंधितांचे मूळवेतन खालीलप्रमाणे निश्चित होईल.

| अ.नं. | नांव | दिनांक ०१.०८.२००५रोजी निश्चित होणारे वेतन रुपये |
|---|---|---|
| ०१. | श्री रघुनाथ भागाजी आहेर | ८२७५/- |
| ०२. | श्री संजय मधुकर जोरी | ८१००/- |
| ०३. | श्री दिनकर मनोहर देसाई | ८१००/- |

तरी उपरोक्तप्रमाणे सर्वश्री आहेर, जोरी, देसाई यांना पदनाम व वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, आस्थापना )

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२. श्रींचे पादुकादर्शन व भक्त मेळावा आयोजित करणेबाबत.**

**निर्णय क्र.४७४.** व्यवस्थापन समितीचे दिनांक २९.०१.२००५ चे सभेतील निर्णय क्र.४६ व दिनांक ८.०२.२००५ चे सभेतील निर्णय क्र.७४ अन्वये हैद्राबाद, मुंबई व दिल्ली येथे साई महोत्सव (श्रींचे पादूका दर्शन व भक्त मेळावा) आयोजित करणेसाठी खालील विश्वस्तांची समिती नियुक्त करण्यात आलेली आहे.

०१. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर,
०२. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे,
०३. मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर
०४. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग
०५. मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव

या समितीने श्रीसाई महोत्सवाबाबत सविस्तर प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा असे ठरलें आहे.

मा.अध्यक्ष महोदय, यांनी सदरचा श्रीसाई महोत्सव (श्रींचे पादूका दर्शन व भक्त मेळावा) सर्व प्रथम मुंबई येथे माहे नोव्हेंबर,२००५ मध्ये आयोजित करावा असे सूचित केले आहे.

या श्रीसाई महोत्सवाचे पूर्व तयारीबाबत आजचे सभेत सविस्तर चर्चा करण्यात आली. साई महोत्सवामध्ये सर्व साईभक्तांचा सहभाग होईल अशा पद्धतीने साई महोत्सवाची तयारी करण्यात यावी. या वर्षी मुंबई शहरात अतिवृष्टी झाल्यामुळे साई महोत्सव घेण्यासाठी योग्य असे वातावरण नाही. याकरिता मुंबई येथे दिल्ली व हैद्राबाद येथील साई महोत्सव घेतल्यानंतर विचार करावा असे ठरलें.

दिनांक ०५ सप्टेंबर,२००५ रोजी हैद्राबाद व दिनांक १२ सप्टेंबर,२००५ रोजी दिल्ली येथे श्रीसाई महोत्सव (श्रींचे पादूका दर्शन व भक्त मेळावा) घेणेकामी सभा आयोजित करण्यात यावी. सभेचे आयोजन करणेकामी त्या त्या ठिकाणच्या साई मंदिर ट्रस्टला पत्रे पाठवून त्या त्या राज्यातील साई मंदिराचे ट्रस्टचे विश्वस्तांना उपस्थित रहाणेबाबत कळविण्यात यावे असें ठरलें.

(कार्यवाही-मंदिर विभागप्रमुख/प्रशासनशाख वशी-५/जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३. शिधा सामुग्री मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.४७५.** सर्व सेवेकरी, दिंडोरीप्रणित श्री स्वामी समर्थ केंद्र, शिर्डी, यांचेवतीने प.पु.गुरुमाऊली श्री आण्णासाहेब मोरेदादा यांचे दिंडोरी प्रणित राज्यस्तरीय सत्संग व शेतकरी मेळावा दि.०७ नोव्हेंबर २००५ रोजी दु.३.०० ते सायंकाळी ६.०० या वेळेत शिर्डी येथे सुर्योदय नगरी, हॉटेल स्वामी रिसोर्ट जवळ नगर-मनमाड रोड येथे आयोजित केला असून सदरचा मेळावा हा राज्यस्तरीय स्वरुपाचा असलेने अतिशय भव्य दिव्य असा होणार असून या मेळाव्यात राज्यातील हजारो स्वामी समर्थ सेवेकरी व शेतकरी बांधव उपस्थित रहाणार आहेत. यावेळी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला असून महाप्रसादाच्या कार्यक्रमासाठी संस्थानकडून भरीव स्वरुपाची वस्तुरुपाने शिधा मिळणेबाबत विनंती आयोजकांनी केलेली असून सदरचे पत्र हे मा.श्री.कैलास(बापू) गोविंदराव कोते, यांचे

लेटरहेडवर लिहिलेले आहे. तसेच सदरच्या पत्रावर मा.अध्यक्ष यांनी " श्री वाक्‌चौरे, विनंती मान्य करावी " असा शेरा दिलेला आहे.

प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ट इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम २१(२)(एक)(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये शैक्षणिक/धार्मिक/सामाजिक संस्थेस छाननी समितीच्या शिफारसीनुसार राज्य शासनाच्या मान्यतेने अनुदान देण्याची तरतूद आहे.

तथापि ; दि.१३/०३/२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील विषय नं.३७, निर्णय क्र.१२९ अन्वये यापुर्वी देण्यात आलेल्या अनुदानास शासनाची मान्यता घ्यावी, ही मान्यता मिळालेनंतरच यापुढे अनुदान मागणीकामी आलेले अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत असें ठरले.

त्याचप्रमाणे शिधा स्वरुपातील मदत देणेबाबतची नियमावली संस्थानने तयार केलेली असून मा.प्रधान सचिव, न्याय व विधी विभाग, मुंबई यांचेकडे मान्यतेसाठी पाठविणेत येणार आहे. त्यावर निर्णय होणे बाकी आहे.

दि.०७ नोव्हेंबर २००५ रोजी होणा-या राज्यस्तरीय स्वामी समर्थ सेवेकरी व शेतकरी मेळाव्याचे या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमासाठी संस्थानकडून शिधा स्वरुपात मदत देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ०७ नोव्हेंबर, २००५ रोजी शिरडी येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्वामी समर्थ सेवेकरी व शेतकरी मेळाव्यास रुपये ५०,००००/- पर्यन्त वस्तूरुपाने शिधा स्वरुपात मदत देण्यात यावी असें ठरलें.

(कार्यवाही - प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४. हरिनाम सप्ताहास मदत करणेबाबत सरपंच, ग्रामपंचायत, रुई (कोहकी) व गावकरी मंडळ, रुई यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.४७६.** श्री.बाबासाहेब (भाऊराव) पोपटराव शिरसाठ, सरपंच, कोहकी व गावकरी मंडळ, रुई यांनी त्यांचे दिनांक १४.०८.२००५ चे पत्रान्वये रुई येथे ११२ वर्षापासून हरिनाम सप्ताहाचा कार्यक्रम अव्याहत चालू आहे. या कार्यक्रमाची सांगता दिनांक १७.०८.२००५ रोजी होत असून, या कार्यक्रमाचे अन्नदानासाठी शिधा रुपाने मदत मिळावी अशी विनंती केलेली असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू कार्यक्रमास रुपये पंचवीस हजार पर्यन्त वस्तूरुपाने संस्थानतर्फे मदत देण्यात यावी असें ठरलें.

(कार्यवाही-प्रशासन शाखा वशी-०५)

वरील निर्णय क्र.४७० ते ४७६सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| (भाऊसाहेब रा.वाकचौरे) | (जयंत मुरलीधर ससाणे) |
| कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) | श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी ) |

*Thursday*
*25072005*